# महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली

दुरध्वनी क्रमांक 02332325914 E-mail-icdsdyceo@gmail.com

**कोटेशन मागणी नोटीस क्र.3**

**जाक्र.जिपंसा/मबाकयोजना/दायित्व/आस्था/वशि/** 1151 /2024-25 **दिनांक** - 05/02/2025

प्रति,

-----------------------------------------

-----------------------------------

विषय :- सन 2024-25 या आर्थीक वर्षात जि.प.स्वीय निधीमधून (सन 2023-24 मधील मंजूर लाभार्थींसाठी दायित्व निधी) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण- दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन प्रशिक्षण देणेकरिता दरपत्रक सादर करणेबाबत.

जिल्हा परिषद स्वीय निधी सन 2024-25 या आर्थीक वर्षात (सन 2023-24 चे दायित्व ) सांगली जिल्हयातील ग्रामीण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण अंतर्गत दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन प्रशिक्षण घेणेकरिता स्थानिक निविदा धारकांकडून खाली नमूद केलेनुसार तांत्रीक व दराचा सिलबंद लखोटा अशा दोन लखोटे पध्दतीने दरपत्रके मागविणेत येत आहेत.

प्रशिक्षणाचे ठिकाण हे संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेशी चर्चा करुन निश्चित करणे,त्या ठिकाणी भौतिक सुविधा संस्थेने करणे,प्रशिक्षण साहित्य व कच्च्या मालाची व्यवस्था करणे, लेखन सामुग्री, कोर्सबाबत आवश्यक साहित्य इत्यादी बाबी संस्थेने पुरविणे यासह दरपत्रक मागणी करणेत येत आहे.

**कामाचे नांव** - महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद,सांगली अंतर्गत जिल्हा परिषद,स्वीय निधी मधून सांगली जिल्हयातील ग्रामीण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण अंतर्गत 90 तासांचे दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन प्रशिक्षण देणे.

**प्रशिक्षण ठिकाण प्रकल्प** :- 1) **शिराळा** -80 लाभार्थी 2) **उमदी** -31 लाभार्थी (मिरज-3 व वाळवा-2 चे 2 लाभार्थी त्यांचे इच्छेनुसार शिराळा किंवा उमदी येथे प्रशिक्षण घेतील )

**प्रशिक्षणाचे स्वरुप** :- (1) मसाला /सुगंधी दुध/ बासुंदी तयार करणे (2) दही/लस्सी/मसाला ताक / कढी इ.तयार करणे. (3)खवा,पेढे,चक्का,आम्रखंड,श्रीखंड,चीज,क्रिम,आइसक्रिम,पनीर तयार करणे (4) कलाकंद, गुलाबजाम, बर्फी,योगर्ट तयार करणे (5) फ्रुटखंड,पंचामृत,कंडेन्सड मिल्क तयार करणे.(6) चहा व चहाचे विविध प्रकार (7) दही,रायता,रसमलाई, इत्यादी

**सादर करावयाची कागदपत्रे (लखोटा क्रमांक 1)** :- संस्थेचे शासकिय नोंदणी प्रमाणपत्र 2) संस्था कौशल्य विकास विभागाकडे V.T.P. (Vocational Training Provider) /V.T.I./ SMART म्हणून नोंद असलेचे प्रमाणपत्र 3) संस्थेचे पॅनकार्ड 4) संस्थेचे GST प्रमाणपत्र / सूट असलेस सूट प्रमाणपत्र 5) संस्थेचे मागील तीन वर्षाचे आयकर रिटर्न (सन 2021-22 ते 2023-24 ) / सूट असलेस प्रमाणपत्र 6) संस्थेचे मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट (सन 2021-22 ते 2023-24) 7) शासकिय कामाकाचा अनुभव असलेबाबत आदेशाची प्रत 8) संस्था काळया यादीत नसलेबाबत संस्थेचे हमीपत्र.

**टिप** -1) एका लाभार्थीवर जास्तीत जास्त 5000/- खर्च करणेत येईल.तसेच प्रशिक्षणार्थीचे उपस्थितीनुसार रक्कम अदा करणेत येईल.

2) प्रशिक्षण किंमतीच्या 10 टक्के होणारी रक्कम लाभार्थीकडून संस्थेने भरुन घेणे आवश्यक आहे.सदरची होणारी रक्कम देयकातून वजा करुन घेणेत येईल व उर्वरीत देयक अदा करणेत येईल.

3) संस्था पात्र / अपात्र ठरविणेबाबतचा अंतिम अधिकार कार्यालयास राहील.

**लखोटा क्र.2**- दराचा लखोटा -

| प्रशिक्षणाचे नाव | एकूण दिवस | प्रशिक्षणाचे एकूण तास | 90 तासांचे प्रशिक्षण देणेसाठी प्रति लाभार्थी एकूण दर नमूद करावेत. |
|---|---|---|---|
| दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन प्रशिक्षण | आदेशानुसार | 90 | |

वर नमूद केलेनुसार सदर योजनेचे दरपत्रक दिनांक 06/02/2024 ते 18/02/2024 या कालावधीत महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली येथे सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत सादर करणेत यावेत.तदनंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. सदरची दरपत्रके त्याच दिवशी किंवा कार्यालयीन सोयीच्या दिवशी उघडणेत येतील.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)**
**जिल्हा परिषद,सांगली**

**प्रत** :- सदरची कोटेशन मागणी नोटीस कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत यावी.